जिल्हा परिषदेमधील कनिष्ठ अभियंता
या पदावरील कर्मचा-यांना मानीव
दिनांक मिळणे बाबत

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सार्वजनिक बांधकाम (उत्तर)
जिल्हा परिषद आदेश क्र.सा.बां/आस्था-2/673 /2025
अहिल्यानगर दि. 24/11/2025

वाचा - १) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागकडील परिपत्रक क्रमांक एस.आर.व्ही/2002 प्र.क्र.2/2002/12दिनांक 06 जुन 2002
२) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील परिपत्रक क्रमांक 2006 प्रक.813/ आस्था-10/दिनांक 28 जुलै 2006
३) मा.अपर आयुक्त (आस्थापना ) विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक यांचेकडील पत्र क्र. संकीर्ण-2024/5981420-4887868 दि.25-8-2025

ज्याअर्थी, श्री. राजू ठकाजी दिघे, कनिष्ठ अभियंता, जि.प.सा.बा. उपविभाग कोपरगाव व इतर 7 जणांना सेवा कनिष्ठ असलेल्या सौ. एस.एस. जगताप, कनिष्ठ अभियंता यांच्या पदोन्नतीचा दिनांक 15/04/2015 हा मानीव दिनांक म्हणून मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना दिनांक 05/07/2025 रोजी सादर करण्यात आलेला होता.

ज्याअर्थी, महाराष्ट्र जिल्हा परिषद (जिल्हा सेवा) सेवा प्रवेश नियम, 1967 मधील परिशिष्ट सहा (नियम-5), मध्ये अशी तरतूद आहे की—"कनिष्ठ अभियंता संवर्गात पदोन्नतीने नेमणूक करण्यासाठी, उमेदवाराने जिल्हा तांत्रिक सेवा वर्ग-3 (अभियांत्रिकी) द्वितीय श्रेणीत किमान 3 वर्षांची अखंड सेवा केलेली असावी व निरीक्षक पदासाठी राज्य शासनाने विहीत केलेली व्यवसायिक परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी. अशा कनिष्ठ अभियंत्यांपैकी योग्य व्यक्तींना सहाय्यक (स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक) या पदावर पदोन्नती दिली जाईल." असी तरतूद आहे.

त्याअर्थी, श्री. राजू ठकाजी दिघे, कनिष्ठ अभियंता, जि.प.सा.बा. उपविभाग कोपरगाव व इतर स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांनी मुख्य अभियंता, संकल्पना संशोधन व सुरक्षितता, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक यांचे पत्र क्रमांक मअप्रप्र/व्याप/क.अ. निकाल 2014/22/2015 दि. 09/03/2015 अन्वये अभियांत्रिकी व्यवसायिक परीक्षा उत्तीर्ण केलेली असल्याने, त्यांना मानीव दिनांक देण्यासाठी शिफारस करण्यात आलेली आहे.

त्याअर्थी, शासन ग्रामविकास विभागाचे शासन परिपत्रक दि. 28/07/2006 नुसार, जिल्हा परिषदेच्या सेवेतील गट-क व गट-ड मधील कर्मचारी/अधिकारी हे जेष्ठ व पात्र असूनसुद्धा पदोन्नतीच्या संदर्भात डावलले गेले असल्याचे निश्चित झाल्यास, त्यांना पदोन्नतीचा मानीव दिनांक देण्याचे अधिकार मा. विभागीय आयुक्त यांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

त्या अनुषंगाने, मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी त्यांच्या पत्र क्र. जा.क्र. संकीर्ण-2024/5981420-4887868/विआशा/आस्था-2 दि. 25/08/2025 अन्वये मानीव दिनांकास मान्यता दिलेली आहे.

श्रीम.एस.एस.जगताप हया कनिष्ठ अभियंता पदावर दिनांक 15/4/2015 रोजी हजर झाल्याने त्या खालील नमूद कर्मचा-यांना जेष्ठतेमध्ये कनिष्ठ असल्याने श्रीम एस.एस.जगताप यांच्या पदोन्नतीच्या पदावरील हजर दिनांक 15/4/2015 हा खालील नमूद केलेल्या कर्मचा-यांना वेतनश्रेणी रु 9300-34800 (ग्रेड पे-4300 )सह मानीव दिनांक मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क | जे. क्र. | कर्मचारी यांचे नांव | शैक्षणीक अर्हता | मेरी/मेटा परीक्षा पास दिनांक | पदोन्नती दिल्याचा दिनांक | संदर्भ क्र.३ नुसार कनिष्ठ अभियंता यांना दयावयाचा/ मंजूर मानीव दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| 1 | 33 | श्री.जी.पी.सवई | कन्स्ट्रक्शन सुपरवायझर | उत्तीर्ण | दि.15.03.2016 | दि.15/4/2015 |
| 2 | 51 | श्री..के.व्ही.जाधव | "सिव्हील ड्राफ्ट्समन (Civil Draftsman) | उत्तीर्ण | दि.15.03.2016 | दि.15/4/2015 |
| 3 | 52 | श्री. के.एन. गऊळ | "सिव्हील ड्राफ्ट्समन (Civil Draftsman) | उत्तीर्ण | दि.15.03.2016 | दि.15/4/2015 |

Scanned with OKEN Scanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 56 | श्री.एम.पी.रामदिन | "आरेखक स्थापत्य" | उत्तीर्ण | दि.08.11.2016 | दि.15/4/2015 |
| 5 | 59 | श्री. ए.पी. वाघ | बी.ए.आरेखक स्थापत्य | उत्तीर्ण | दि.15.03.2016 | दि.15/4/2015 |
| 6 | 67 | श्री. एस.एस. कोटंबे | "ड्राफ्ट्समन कोर्स" (Draftsman Course) | उत्तीर्ण | दि.15.03.2016 | दि.15/4/2015 |
| 7 | 75 | श्रीम.आर.एन.नागपूरे | "आरेखक स्थापत्य" | उत्तीर्ण | दि.15.03.2016 | दि.15/4/2015 |
| 8 | 78 | श्री.आर.टी. दिघे | "सिव्हील ड्राफ्ट्समन (Civil Draftsman) | उत्तीर्ण | दि.12.07.2016 | दि.15/4/2015 |

उपरोक्त कर्मचारी यांचेमूळ सेवा पुस्तकामध्ये सदर मानीव दिनांकाची नोंद घेण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सदर आदेश जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांच्या अधिकृत संकेतस्थळावर www.nagarzp.gov.in येथे प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संकेतांक 202511241300061.. असा आहे.

.

Signed by Anand
Subhashlal Bhandari
Date: 18-11-2025 21:35:17
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री- वरिल 1 ते 8 मधूल ----पदनाम---------------------------जि.प.सा.बा.उपविभाग-
जिल्हा अहिल्यानगर

प्रत- संबधीत उप अभियंता जि.प.सा.बा.उपविभाग ---------------ता---------------- जिल्हा अहिल्यानगर

२/- मुळ सेवापुस्तकामध्ये नोंद घेवून सदरचा आदेश सेवापुस्तकामध्ये डकविण्यांत यावा.

प्रत- मा.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधकिारी जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना माहितीसाठी सविनय सादर

प्रत- मा.मुख्य लेखा व वित्त आधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना माहितीसाठी सविनय सादर

Scanned with OKEN Scanner